महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

==============================================================================

जावक क्रमांक – ७३४/३६ दिनांक :- २८ मार्च , २०२५

प्रसिद्धिपत्रक

# 'म्हाडा'त सुनावणी झाल्यावर ७ दिवसांत आदेश निर्गमित करा

म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांचे निर्देश

मुंबई, दि. २८ मार्च, २०२५ :- कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने विविध प्रकरणांवर अपीलअंतर्गत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात घेतल्या जाणाऱ्या सुनावण्यांमध्ये निर्णय झाल्यानंतर संबंधित आदेश ७ दिवसांच्या आत निर्गमित करावेत, असे स्पष्ट निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांनी दिले आहेत.

मा. उपाध्यक्ष यांच्या दालनात विकास नियंत्रण नियमावली ३३(७), बृहतसूची (मास्टर लिस्ट), म्हाडा संगणकीय सोडत व इतर विषयांवरील अपील सुनावण्या घेतल्या जातात. मात्र, या सुनावण्यांवरील आदेश निर्गमित होण्यासाठी एक महिना, दोन महिने किंवा त्याहून अधिक कालावधी लागत असल्याचे आढळून आल्याने श्री. जयस्वाल यांनी हा कालावधी सात दिवसांवर मर्यादित ठेवण्याचा निर्णय एका कार्यालयीन आदेशाद्वारे आज जाहीर केला आहे.

तसेच सदरील निर्णय म्हाडाच्या विभागीय मंडळांतील मुख्य अधिकारी व इतर विभाग प्रमुखांच्या स्तरांवर घेण्यात येणाऱ्या सुनावणींकरिता देखील लागू करण्यात यावेत, असे निर्देश श्री. जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

Maharashtra Housing & Area Development Authority
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Phone No:- 022 66405066/77 Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

Outward No. : 734/36 Dt. March 28, 2025

Press Release

**Orders to be issued within 7 Days Post-Hearing -** MHADA VP & CEO, Mr. Sanjeev Jaiswal's Directive

**Timeline introduced to streamline appeals; orders to follow within seven days**

Mumbai, March 28, 2025 – In a decisive move to enhance efficiency and ensure timely resolution of matters, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA), has mandated that all orders pertaining to hearings conducted in his office must be issued within seven days of the of the hearing date.

Appeals concerning Development Control Regulation 33(7), the Master List, MHADA's computerized lottery system, and other pertinent matters are regularly addressed in the Vice President's office. It has been observed that the issuance of orders in these cases often experiences delays, sometimes extending to one or two months. Taking serious note of this, Mr. Jaiswal has issued an official directive to limit the order issuance timeframe to seven days.

Besides, he has instructed that this directive be uniformly implemented across MHADA's divisional boards and all relevant departments, including hearings conducted by Chief Officers and department heads.

This initiative aims to bring greater transparency, efficiency, and accountability to MHADA's processes, reinforcing the authority's commitment to serving the public with speed and diligence.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial